सातारा TODAY
सकाळ
सातारा, रविवार, १९ जुलै २०१५
२

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

# आरोग्यदायी समाजनिर्मितीत जनजागृती महत्त्वाची

## प्रा. माळी; डी. पी. भोसले महाविद्यालयामध्ये जागतिक लोकसंख्या दिन कार्यक्रम

**पळशी, ता. १८** : लोकशास्त्र, शाश्वत भविष्य व आरोग्यदायी समाजनिर्मितीसाठी जनजागृतीची गरज आहे, असे मत प्रा. सचिन माळी यांनी व्यक्त केले. कोरेगाव येथील डी. पी. भोसले महाविद्यालयामध्ये जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. दत्तात्रय गाताडे होते. अविकसित देशांमध्ये लोकसंख्येची समस्या भेडसावत असल्याचे व उपलब्ध साधन संपत्तीचा उपयोग हाच त्यावरील उपाय असल्याचे प्रा. माळी यांनी या वेळी सांगितले.

दारिद्र्य व अज्ञानामुळे लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. सुशिक्षित, सुसंस्कृत लोकांची संख्या वाढली, तर गुणवत्ता वाढेल आणि लोकसंख्या कमी होण्यास मदत होऊन पर्यायाने देशाचा सर्वांगीण विकास होईल, असे मत डॉ. गाताडे यांनी मांडले. प्रा. दिलीप पवार यांनी प्रास्ताविक व प्रा. उज्ज्वला मदने यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. एस. जी. सायकर यांनी आभार मानले. कार्यक्रमास अधीक्षक एन. जे. शेख यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.